जा. क्र. /उविममु/तेलताड/2428/२०२१
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग
दि. 21 DEC 2021

प्रति,

..................................
..................................
..................................

**विषय: प्रति तास तत्त्वावर जे. सी. बी. भाडयाने घेणेबाबत दरपत्रक पुरविणेबाबत...**

महाशय,

उद्यानविद्या महाविद्यालय मुळदे, ता. कुडाळ, अंतर्गत तेलताड प्रक्षेत्रावर भाडे तत्त्वावर जे. सी. बी. मार्फत काम करुन घ्यावयाचे असून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशील | अंदाजित कामाचे तास | शेरा |
|---|---|---|---|
| १. | तेलताड प्रक्षेत्रावर झाडे जे. सी. बी. व्दारे मुळासहीत काढणे व बांधबंदीस्ती तसेच जमिनीचे सपाटीकरण करणे<br>**(टिप – तेलताड प्रक्षेत्रावरील काढावयाच्या तेलताड झाडांची पाहणी करावी.)** | एकुण **२५** तास | प्रति तासाचा दर नमूद करावा. |

याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, कृपया आपण वरील तपशिलाप्रमाणे दर नमुद करून दरपत्रक या कार्यालयात **दि.०४/०१/२०२२** पर्यत या कार्यालयास प्राप्त होईल अशा तऱ्हेने सादर करावे. उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**दरपत्रकाबाबत अटी खालीलप्रमाणे.**

१) दरपत्रक बंद लखोटयातून सादर करावे व त्यावर **"जे. सी. बी प्रती तास भाडयाने पुरविणेबाबत दरपत्रक"** असे स्पष्ट नमुद करावे.
२) दरपत्रकात दिलेले दर हे सर्व करांसहीत स्पष्टपणे नमुद करावे.
३) दरपत्रक सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग – ४१६५२० या पत्यावर पोस्टाने पाठवावे.
४) दरपत्रकात या पत्राचा संदर्भ नमुद करावा.
५) टपालाद्वारे दरपत्रक पोहोचण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
६) सर्व दरपत्रके मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
७) दरपत्रकांवर जी. एस. टी. नंबर नमुद करावा.

आपला विश्वासू

**सहयोगी अधिष्ठाता**
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

प्रत – प्रभारी अधिकारी कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्र, डॉ. बा.सा.को.कृ.वि. दापोली यांना विनंती करण्यात येते कि, उपरोक्त दरपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर मुदतीत प्रसिध्द करण्यात यावे.